Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

आडगाव (ता.एरंडोल जि.जळगाव) येथील शेषशाही (अनंतशायी) विष्णूमूर्ती

दिपक बाबुलाल शिरसाट
इतिहास विभाग,
महिला महाविद्यालय, जळगाव

प्रस्तावना:

आडाचे (विहिर) गांव ते आडगांव. आडगांव हे जळगांव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील महत्वाचे गांव आहे. जळगांव जिल्हा शहरापासुन पश्चिमेला ४२ कि. मी. अंतरावर आहे. एरंडोल या तालुका शहरापासुन १८ कि.मी. अंतरावर आहे. आडगांव हे राधाकृष्ण मंदिरासाठी प्रसिध्द आहे. हे गांव संत माहुजी महाराज यांच्या नावाने देखील प्रसिध्द आहे.[१] आडगांवचे स्थान २०° ७८' २५" अक्षांश आहे. २०११ च्या जनगणेनुसार आडगांवचे लोकसंख्या ७७२८ इतकी आहे. भारतीय स्वातंत्र लढ्यात आडगांवचे योगदान महत्वपूर्ण आहे. १९४२ च्या चले जाव आंदोलनात भगवान भुसारी, शामराव पाटील, त्र्यंबकराव वाणी या सारख्या हुतात्मांनी प्रणाची पर्वा न करता बलिदान दिले आहे. या तिघही हुतात्माचे स्मारक आडगावच्या ग्रामपंचायती समारे उभारलेले आहे[२]

आडगांवला काष्ट शिल्पाचे राधाकृष्ण मंदिर व संत माहुजी महाराज यांच्या समाधीचे एक सुंदर मंदिर आहे[३] गावाला धार्मिक व ऐतिहासिक पार्श्वभुमी आहे. आडगांवचे भौगोलिक क्षेत्र २७२६.४४ हेक्टर इतके आहे. २०११ च्या राष्ट्रीय जनगणेनुसार आडगावची लोकसंख्या ७७२८ आहे. त्यात पुरुषांची संख्या ४०८० तर महिलांची संख्या ३६४८ आहे.[४] गावात गावाच्या मध्यभागी राधाकृष्ण मंदिर आहे. गावात बारागाड्या, माहुजी महाराज सप्ताह दरवर्षी नित्याने साजरा केला जातो. प्रस्तुत लेखात आडगावच्या विष्णुमुर्तीवर प्रकाश टाकला केला आहे.

मुर्तीप्राप्तस्थळ :

आडगांवत प्रवेश करतांना उजव्या हाताला संत माहुजी महाराजांची समाधी स्थळ मंदिर आहे. मंदिर पुर्वाभिमुख असून मंदिराच्या द्वारशाखेवर संत माहुजी महाराज यांच्या समाधी दर्शविणारा द्वारलेख आहे. हा बहुधा समाधीलेख आहे.या समाधी मंदीराच्या उजव्या बाजुला खाली एक शेषशाही दशावतार विष्णू मुर्ती आहे.

सदर मुर्ती २ फुट १० इंच लांब व १ फुट ६ इंच रुंद असुन अतिशय आकर्षक व कोरीव आहे.[५] दशावतार मुर्तीत पहावयास मिळतो. मुर्तीची पार्श्वभुमी अधचंद्राकारअसुन विष्णुने विविध आयुचे धारण केलेली आहे. विष्णुचे मुख्य आयुचे स्थान भारतातील दोन प्रमुख पंथ वैष्णव व शैव पैकी वैष्णव संप्रदायी अराध्य दैवत आहे.

विष्णु देवता मूर्ती उदय आणि विकास:

ऋग्वेदात विष्णू संदर्भात तीन सुक्ते आहेत. सुपर्ण हे विष्णू चे एक नाम आहे. ऋग्वेदात विष्णु म्हणजे पक्षीरुप सूर्य आणि सूर्यरुप संपुर्ण गुरुत्मान होय. त्याला गरुड असेही म्हणतात. त्रिविकम म्हणजे वेगवान विस्तिर्ण गती असलेला. उरुक्रम म्हणजे विस्तर्ण पावले टाकणारा, ही रुपे विष्णुला लावण्यात येतात.[६] ऋग्नदान लक्षण असे विष्णुसूक्त आहेत.

अतोदंवा अवन्तु नो मतो विष्णूर्वि चक्रमे।
पृथिव्या, सप्तधामभिः इद विष्णूर्वि चकमे त्रेधा निदधे पद्म।
समळहमस्य पांसुरे।
त्रीणी पदावि चक्रमे विष्णूगौपा अदाभ्य।
ततो धर्माणी धारयन।
विष्णो : कर्माणी पश्चयत तो व्रतानि पस्पशे।
इन्द्रस्य युज्य सखा।
तदवीष्णो परम पदसदा पशन्ति सूनय। दिविव चक्षू शतनम्।
तदविप्रासो विष्णन्यओ जागृतवासा समिन्धते।
विष्णोर्यत्परम पद्म।

यानुसार पृथ्वीचे सात विभाग करुन या (वरील) स्थानाचे विष्णु भ्रमण केलेले आहे. त्या सर्व ठिकाणांना देव आमचे रक्षण करो ती सर्व ठिकाणी विष्णूने आकमीत करुन व्यापलेली आहेत. त्याने आपली तीन पावले तीन स्थळी ठेवली असुन सारे जगत परमज्ञान झाकले व व्यापले गेले. जो या जगाचा पालनकर्ता आहे. ज्याला कोणीही ठकवु फसवु शकत नाही. ज्याचा कोणीही अशा या विष्णूचा कोणीही पराजय करु शकत नाही. अशा या विष्णुने हे जग फक्त तीन पावलात आकमित केलेले आहेत. त्याने प्रत्येक ठिकाणी सत धर्माची स्थापना केलेली आहे. असे वर्णन आहे[७] यास्काने निरुक्तात विष्णु शिपिशिष्ठ नावासंबंधी कात्सितार्थेय पर्वभदपि असे विधान केलेले आहे. प्राचीन आर्य दोन गटात विभागले. आर्याच्या फार मोठया गटाची विष्णु ही देवता होती.यास्कने निरुक्तात विष्णू या शब्दाची व्यत्पत्ती विष म्हणजे सतत कियाशिल असणे अशी केलेली आहे. महाभारतात महर्षी व्यासांनी त्याला अखिल सृष्टिचा शास्ता व नियंता बनविले आहे.[८]

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

भारतात आसेतू हिमालयात असंख्य विष्णु मंदिरे आहेत तसेच विष्णुमुर्तीही आहेत. विष्णुमुर्तीचे प्रामुख्याने दोन प्रकार आढळतात. साधारण व आवतार काही प्रसंगी विष्णु मुर्ती एकटी असते. काही प्रसंगी ती श्रीलक्ष्मी भू व सरस्वती यापैकी दोन देविसह असते. विष्णु बसलेल्या अवस्थेत असतांना एकटी लक्ष्मी त्यांच्या शेजारी असते. काही प्रसंगीने विष्णुच्या मांडीवर वसलेली असते. विष्णु शेषशेय्येवर पडलेला असल्यास लक्ष्मी त्यांचे पादसंहसान करीत असलेली दर्शविण्यात आलेली असते. विष्णुमुर्ती उभी असल्यास लक्ष्मी सुक्ष्म स्वरुपात दर्शवितात त्याच्या दुसऱ्या बाजुस गरुड असतो. विष्णुची गरुडरुप मुर्ती देखिल आढळुन येते.

विष्णू ही संपुर्ण वैदिक देवता होय. ऋग्वेद काळात तो उमेंद्र असला तरी पुढे त्यांना स्थान प्राप्त झाले. अवतार संकल्पनेमूक विष्णूला सामान्यरुप प्राप्त झाले आणि सृष्टिचा निर्माण विधाता बनला. परिणामी त्याने प्रजापती आणि ब्रम्हा यांना स्वताः समावुन घेतले. ब्रम्ह, विष्णु, महेश, या त्रयीत तो स्थितीचा प्रतिनिधत्व करणारा देव बनला. अवतार मालिकेत त्याने भक्तांस संरक्षण दिले. त्यासाठी लढा दिला दैत्य व राक्षसांचा विकास केला. श्रीकृष्णाच्या रुपाने त्याने पांडवांना सर्वतोपरी सहाय्य केले. विष्णु जेव्हा २४ नावांपैकी एका रुपात असतो. तेव्हा त्याला चार भुजा असतात. या रुपातील त्याच्या भुजांची संख्या दोन, चार, आठ, किंवा अधिक असते. विष्णूच्या चार हातात शंख, चक गदा व पदम् गदा, हे आयुध अवश्य असतात. हृदयावर कौस्तुम मणी व श्रीवत्सलांछन असते. त्यांच्या गळयात गुडघ्यापर्यंत लोंबत असलेली वैजंतीमाळा असते.[११]

कुशाण सम्राटाच्या काळापासून विष्णूच्या अवतार मूर्ती बनवल्या जात . गुप्त सम्राट वैष्णव होते आणि काही गुप्त सम्राट स्वतःला परम भागवत मानतात. त्या काळात अनेक ध्वजस्तंभ उभारण्यात आले. वैष्णव धर्म वाढला.[१२]मध्ययुगात नृरसिंह स्त्रीमुख व वराह यांची मुखे असलेल्या विष्णुच्या चर्तुमुखी मुर्ती घडविण्यात आल्या. वैकुठ अनंत, त्रीलोकमोहन विश्वरुपी ही नावे त्या मुर्तीला देण्यात आली. त्या मुर्तीला आठ, बारा, सोळा, भुजा असतात. अशा प्रकारच्या मुर्त्या कश्मिर राज्यातील अवंतीपुर येथील उत्खनात उपलब्ध आहेत. तेथील मार्तंड मंदिरातील मुर्ती अष्टभुजा विष्णुमुर्ती आहे. मथुरा येथील उत्खनात विष्णुरुप विष्णुमुर्ती सापडल्या आहेत. येथील मुर्तीच्या चारही बाजुस वसु रुद्र, आदित्य शिव, ब्रम्हा, सूर्य, चंद्र देवतांची मुर्ती कोरण्यात आलेल्या आहेत. काही विष्णू मुतीच्या एका बाजूस वराह आणि दुसऱ्या बाजुस नृरसिंह असलेले आढळुन येते. शेषशायी अथवा अनंतशयन हा विष्णु मुर्ती प्रकार शिल्पकारांचा विशेष आवडता असलेला आढळुन येतो. या शिल्पात विष्णुचा डावा पाय त्याच्या शिराच्या समांतर उचलेला दर्शविला असतो. बदामी येथील अशी त्रिविकम मुर्ती उत्कृष्ट मानली जाते.[१३]

विष्णूची विशिष्ट आयुधे अलंकार आहेत. विष्णूचा एक परिवार आहे. शंक, चक्र, गदा, किरीट, ही त्यांची आयुधे व अलंकार असुन पुष्टी लक्ष्मी व गरुड यांचा त्याच्या परिवारात अंर्तभाव होतो. यापैकी प्रत्येकाची विशिष्ट वैशिष्टे आहे. वैष्णव संप्रदायात त्यांचा विशिष्ठ अर्थ लावण्यात येतो. विष्णूच्या आयुधांना विशिष्ट नावे देण्यात आलेली आहेत. विष्णूचा शंक पुर्ण चंद्रकृती असून त्यांचे नांव पांचजन्य आहेत.भारतात विष्णूच्या असंख्य मुर्ती आहेत. विष्णुचे साकारण दोन अवतात मानले जाते काही वेळेस विष्णुमुर्ती एकटी असते. काही वेळेत श्री.भूलक्ष्मी व सरस्वती यापैकी कोणत्याही दोन देवता सोबत असते.विष्णू ज्या वेळेस बसलेले असतात त्यावेळी लक्ष्मी एकटीच त्यांच्या शेजारी दाखवतात.

कधी विष्णूच्या मांडीवर असते. काही वेळेत विष्णूंच्या डाव्या किंवा उजव्या अंगी असते. विष्णू जेव्हा उभे असेल तर लक्ष्मी सुक्ष्म रुपाने दाखवतात दुसऱ्या प्रकरात गरुड दाखवतात बैठी विष्णूमुर्ती गरुडावर आरुढ असते. विष्णू जेव्हा केशवादी २४ नावाने एका नावाने किंवा एका नावाने असताता तेव्हा त्यांना नियमाने चार हात असतात इतर रुपात हातांची संख्या दोन, चार, सहा, आठ त्याहुन अधिक असु शकतात.[१४]विष्णूने आपल्या चार हातात शंख, चक, गदा आणि पदम धारण केले आहेत.

त्याचे हृदय कौस्तुभमणी आणि श्रीवत्सलांचनाने सुशोभित आहे.साधारणतः कुशाणकाळापासुन विष्णुच्या अवताराच्या मुर्ती आढळतात. अवतारांचे एकत्रीत मुर्तीकरण त्या काळात मंदिरावर दिसु लागल्याचे उल्लेख मिळतात. बंगालमध्ये विष्णुपट बनु लागले त्यावर दशवतारांच्या मुर्ती कोरल्या जावू लागल्या. अवतारांच्या पृथक मुर्ती बनविल्या जावु लागल्या त्यात वराह, नृरसिंह, वामन, यांच्या मुर्ती विपुल प्रमाणात आढळतात गुप्तकाळात विष्णुचा प्रसार झाला. एवढेच नव्हेतर चर्तुरमुख मुर्त्याही बनु लागल्या। नरसिह शिरमुख आणी वराहमुख चार मुखे घडवुन कलाकारांनी त्या मुर्त्या आकारत आणल्या वैकुठ, अनंत, त्रिलोक्य मोहन, विश्वरुपी अशी नावे दिली. त्यांना ८, १२, १६, २०, भुजा लावण्यात आल्या.[१५]शंख पंचमुखात्मक संस्क्तीचा प्रतिक असतो त्याला 'पाव्यजन्य' म्हणातात चक हे आयुध मानाचे असते त्याला सुदर्शन संबोधतात. गदा आद्यविद्या दर्शविते. त्याला कौमदकी म्हणतात. पदम् सृष्टीचे प्रतिक असते धनुष्य अदिमायेचे प्रतिक असते. त्याला साड़र्ग संबोधतात श्रीवत्स अर्थात शुभमणी हे तेजाचे प्रतिक असते. वैजंतीला अध्या संबोधतात. आजया शक्ती असते. किरीटयुक्त कुटसत्व असते. कुडंले क्षर आणी अक्षतत्वाचे प्रतिक असते.

एवढंच नव्हेंतर गरुडाचा रंग कमलवर्ण असतो. तर गदा कुष्णवर्ण दर्शविते सुष्टी (एक भार्या) शिरिष पुष्पा सारखी प्रतिक असते. लक्ष्मी सुवर्ण वर्णाची असते. शंख हा पुर्ण चंद्रासारखा असतो. कौस्तुभ लाल रंगासारखा असतो चक हे सहस्त्र सुर्याच्या वर्णाचे असते. श्रीवत्स कदमपुष्पाच्या वर्णाचा असतो. वैजतीमाला ही पंचवर्णाची प्रतिक असते. अनंतनागविष्णूची विविध रूपे मेघ रंगाच्या चिन्हावरून ओळखली जातात. विष्णूची 24 नावे आहेत. विष्णूची सोळा प्रकारे पूजा केली जाते. खिर आणि शिरा हे विष्णूचे प्रमुख प्रसाद मानले जातात. तुळशीची पाने पूजेत वापरली जातात.विष्णूला कमलप्रिया विष्णू असे संबोधले जाते.[१६]विष्णूच्या उपासनेचे मासिक नियम सांगितले आहेत: मार्गशीर्षात केशव,

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

पौषात नारायण, माघमध्ये माधव, फाल्गुनमध्ये गोविंदा, चैत्रात विष्णू, वैशाखात मधुसूदन, जेष्ठात त्रिविक्रम, आषाढात वामन, श्रावणात श्रीधर, भाद्रपदात ऋषिकेश अश्विनमधील पद्मनाथ आणि कार्तिकातील दामोदर अशा संस्कृतीचा उल्लेख संस्कृती कोषात आढळतो.[१७]

आडगांव येथील शेषशाही दशवतार विष्णु मुर्ती

सदर मुर्ती आडगांव ता. एरडोल जि. जळगांव येथे मंदिराच्या उजव्या बाजुला पुर्व दिशेला ठेवलेली आहे.मुर्ती ही अखंड दगडात कोरलेली तेथे असुन शेषविष्णुची मुर्ती आहे. मुर्ती विष्णुची असल्याने वरच्या बाजुला अष्टदिग्पाल यांचे संकेत निहाय शिल्प कोरलेले आहे. सदर मुर्तीला शेंदूर लावलेला असुन मुर्तीतीतील अनेक अवताराचे प्रसंग ओळखण्यास अवघड वाटतात.[१८]

मुर्तीचे वर्णन :

मूर्ती बघताना ती शयन स्थितीतील विष्णूची मूर्ती आहे. मूर्तीला चार हात असून ,उजव्या हातात शंख आहे त्यावरच्या हात कटकहस्त (उभय) स्थितीत आहे. डाव्या बाजूच्या वरच्या हातात चक्र असून त्याखालील हातात गदा आहे. मुर्तीच्या वरच्या बाजुला तीनफनी असलेलेला शेष नाग दाखविलेला आहे. पद्मपिठावर स्थापलेल्या या मुर्तीच्या उजव्या चरणाजवळ एक स्त्री दर्शविली आहे बहुधा ती लक्ष्मी असावी. किरीट मुकुट, कडदोरा, तथा अलकारांने भूषित पितांबरपरिधान केलेला सौम्य मुद्रेचा चार हातांची एक विलोभनीय अशी एकमेव विष्णुची मुर्ती आहे.

सदरमुर्ती श्यामवर्णाची धान्याप्रमाणे असते. परंतु प्रस्तुत मुर्तीला गावकऱ्यांनी शेंदुर लावलेला आहे[१९] एवढेच नव्हे तर ब्रम्ह विष्णु आणि (शिव) या प्रमुख देवतांमध्ये विष्णूमूर्तीला अतिशय महत्व आहे. विष्णूची कल्पना वैदिक काळापासुन रुढ होत गेली. विष्णुला ऋग्वेदांत सुर्याचे एकरुप मानले आहे. डॉ. रा. नां. दांडेकर यांनी वि. उडणे या धातुला स्नु हा प्रत्यय लागुन विष्णु हा शब्द सिध्द झाला आहे. असे मत मांडले आहे.

आडगाव येथे शेषशाही दशावतार विष्णूमूर्ती (प्रतिमा क्र. १)

उत्तर वैदिक काळात पांचरात्र मत विष्णूचे महत्व वाढविण्यास कारणीभुत ठरले. पांचरात मतातुन वासूदेव संकर्षण प्रध्युम्य अनिरुध्द हे विष्णूचे आयुधे मानुन कल्पुन आयुध्द कमानुसार चौविस विभव विष्णूमुर्ती तयार झाल्या असे भागवतपुराणानुसार कळते तसेच कलीयुगापर्यंत चौवीस अवतार घेतले आहेत.

आडगाव येथे दशावतार विष्णू मूर्ती विसावताना (प्रतिमा क्र. 2)

प्रस्तुत मुर्तीची शेषशाही विष्णुमुर्ती व दशावतार मुर्ती आहे. यात विष्णु क्षीरसागरामध्ये अनंत शेषनागावर बसलेले आहेत त्यात त्यांची पत्नी (लक्ष्मी) आहेत मुर्तीच्या उजव्या बाजुला जलचर (मत्सकुर्म) वनचर (वराह नृसिंह) ब्राम्हण (वामन परशुराम) क्षत्रिय (राम, कृष्ण) बुध्द व कल्की विष्णुमुर्तीच्या पाठशिलेवर वरच्या बाजुला हे दशावतार कोरलेले आहेत. आडगांव च्या हया शेषशाही दशावतार विष्णू मुर्तीला शयन मुर्ती देखिल संबोधले जाते. या प्रकाराला त्या प्रतिमेला योगशयन प्रतिमा असे देखील संबोधले जाते. नागाच्या वेठोळयावर विष्णूची आडवी झालेली मुर्ती दाखवितात. विष्णू मुर्तीचा उजवा हात किरीट मुकुंटाला स्पर्श करतो आणि दुसरा हात करक अवस्थेत असतो पायथ्याशी लक्ष्मी देवी असते.व खालच्या दुसऱ्या हातात गदा आहे.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / SJIF Impact- 3.4 / September-2025/ Special Issue 02 Volume I (A)

मूर्तीच्या हातातील आयुधे :

शंख- प्रस्तुत मुर्तीच्या उजव्या हातात शंख आहे.

चक - डाव्या प्रत्येकी दोन हाता वरच्या हातात चक आहे. विष्णुचे चक सहस्त्र सुर्यासम आहे. त्यांचे नाव सुदर्शन असुन, हे मनाचे प्रतिक मानले जाते

गदा : विष्णूच्या गदेचा वर्ण कृष्ण आहे. नाव कौमोदनी असून हे आदिविद्येचे प्रतिक आहे.

पद्म : पद्म सृष्टिचे प्रतिक होत.

विष्णूच्या धनुष्य 'शाडगं असुन ते आदि मायचे' प्रतिक मानले जाते. श्रीवत्सकौस्तुभ तेजाचे प्रतिक मानले जाते. कुंडले तथा वैजनीमाता ही पंचवर्णाची असुन ह्या आद्या व आजचा शक्ती होत. पृष्टी ही विष्णूची भार्या आहे. ती पुप्पाप्रमाणे आहे. लक्ष्मी सुवर्णवणांची आहे. अनंतनौय मेधवर्णाच्या आहे. अशा प्रकारचे वर्णन प्रस्तुत मुर्तीतुन प्रतित होते.[२०]

शेषयायी किंवा अनंतशयन ही मुर्ती कलाकारांना फार आवडते. ही मुर्ती कशी घडवावी यांचे वर्णन अग्निपुराणात आहे. खावस आगम आणि पंचरात्र संहिता यामध्ये मूर्तीच्या श्रेणीत ३६ विष्णूची गणना केली आहे. विष्णूच्या स्थिरमुर्तीला 'ध्रुवबेर' म्हणतात योग भोग, वीर, आभिचारिक असे विष्णचे चार भेद असतात. स्थानक, आसन, शयन, उत्तम मध्यम, अधम असेही वर्गीकरण केलेले आहेत.[२१]बौध्द शिल्पात विद्युज्वालाकराली, दशभुजसीतमारीची आणि उभयवशहानन मारीची यातील देवता विष्णूला पायदळी तुळवीत आहेत. असे विष्णूरुप आढळते. विष्णूवाहन अवलिकेतेश्वराची मुर्तीही काही ठिकाणी आढळते जैन मूर्तिकलेत ऋषभनाथ या तीर्थकारांचा चाकर या रुपात विष्णू दाखविलेला आहे.

मुर्तीचा काळ - सदर मुर्तीचा काळाचा अभ्यासतांना गावात विशेषतः मध्यकालीन पेशवेकाळातील स्थापत्य व काष्ट मंदिरे आढळतात. सदर मुर्तीही तेरावे शतकारातील यादवकाळातील असावी. मुर्ती ज्या ठिकाणी आहे. ते मंदिर आज महुजी महाराज समाधीस्थान मंदिर आहे.प्रस्तुत मुर्ती अखंड दगडात कोरलेली आहेत. ही मुर्ती शेषशाही दशावतात विष्णु मुर्ती आहे. सदर मुर्ती शयनअवस्थेत उत्तम स्थितत आहे. सदर हा परिसर विष्णु देवता उपासक असावा. मुतीच्या आकारावरुन अवतार संकल्पना दृष्टिस पडते. महाराष्ट्रातील अत्यंत कमी ठिकाणी या प्रकाराची मुर्ती पहावयास मिळते. मूर्तीचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे.

संदर्भ

१. चौधरी कि.का:जळगाव जिल्हा गॅझेटियर, महाराष्ट्र राज्य, दर्शनिका विभाग प्रकाशन, मुंबई मराठी आवृत्ती, १९९३ पृ. ३१४.
2. कित्ता
3. कित्ता.
४.. कित्ता,
५. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि. १७ फेब्रुवारी २०२२.
६. पत्की श्री. मा.भारतीय संस्कृतीतील प्रतिमा आणि प्रतिके, मलिंद प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९० पृ. ८३
७. कित्ता.
८. कित्ता.
९. कित्ता.
१०.. कित्ता.
११.कित्ता.
१२.कित्ता.
१३.. कित्ता.
१४. कित्ता.
१५. कित्ता.
१६पत्की श्री. मा, पूर्वोक्त पृ.१०१
१७. कुलकर्णी र. पू. (अनु.) काश्यपिशल्प, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती, १९८७ पृ. १७७ - १७८.
१८. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि. १७ फेब्रुवारी २०२२.
१९. प्रत्यक्ष सर्वेक्षण दि. २८ फेब्रुवारी २०२२
२०. कित्ता.
२१. जोशी महादेवशास्त्री होडरकर पद्मजा (सं.), भारतीय संस्कृतीकोश खंड 8 भारतीय संस्कृती कोशप्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती१९६४ पृ. ७९७ ९८.